**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०६/०२/२०१०

**ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**

**सभा सूचना क्रमांक ९, दिनांक ०६/०२/२०१०**

प्रति,
सन्मा.श्री/श्रीमती-----------------------
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सूचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक १७/०२/२०१० रोजी सकाळी ११.०० वाजता** ठाणे महानगरपालिकेच्या ‘ **भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सभा सूचना क्रमांक ९, दिनांक ०६.०२.२०१०** रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत आली आहे.

तरी सदर सभेस कृपया आपण उपस्थित रहावे ही विनंती.

**मा.महापौर महोदय यांचे मंजूरीने .. .. ..**

**(सौ. छाया प्र. मानकर )**
**महापालिका सचिव,**
**ठाणे महानगरपालिका,ठाणे.**

**सभा सूचना क्रमांक ९, दिनांक ०६.०२.२०१० ची विषयपत्रिका.**

**प्रश्नोत्तरे.**

| **प्रकरण क्रमांक** | **विषय** |
|---|---|
| १६८ | मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(४) अन्वये मा.स्थायी समितीच्या निवृत्त होणा-या सदस्यांचे जागी कलम २० (५) अन्वये नविन (आठ) सदस्यांची नेमणूक करणे. १ मार्च २०१० रोजी निवृत्त होणा-या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे.<br>**१) सन्मा. श्री. चंद्रगुप्त सिताराम घाग**<br>**२) सन्मा.श्री. राजन नारायण किणे**<br>**३) सन्मा. श्री.सुधाकर वामन चव्हाण**<br>**४) सन्मा. श्री. पांडुरंग गोविंद पाटील**<br>**५) सन्मा. श्री. हणमंत ज्ञानु जगदाळे**<br>**६) सन्मा. सुभाष आत्माराम खारकर**<br>**७) सन्मा. सुधीर विष्णू कोकाटे**<br>**८) सन्मा. श्रीमती सुहासिनी सुनिल लोखंडे**<br>महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी २००७ रोजीच्या शासन नियमानुसार पक्ष व गटाचे तौलानिक संख्या बळानुसार मा.स्थायी समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशित केले जातील. |

१६९ मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २५(५) अन्वये मा.परिवहन समिती सदस्य प्रत्येक दुस-या वर्षाचा कालावधी पूर्ण केला असल्याने पुढील सदस्य १ मार्च २०१० रोजी माध्यान्होत्तर निवृत्त होत आहेत. कलम २५ (७) अन्वये रिक्त जागी नेमणूका करावयाच्या आहेत. निवृत्त होणा-या सदस्यांची नांवे पुढीलप्रमाणे.

**१) सन्मा. श्री. सुरेश माधवराव मोहिते**

**२) सन्मा. श्री. रामदास भाऊसाहेब तांबे**

**३) सन्मा. श्री. दत्तात्रय विष्णू माने**

**४) सन्मा. श्री. प्रकाश शांताराम कदम**

**५) सन्मा. सौ. सुजाता विजय घाग**

**६) सन्मा. श्री. भरत अभिमन्यू चव्हाण**

निवृत्त होणा-या सदस्यांचा जागी नियम २५ (२) अन्वये यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तींची नेमणूक करावयाची आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या २७ फेब्रुवारी २००७ रोजीच्या शासन नियमानुसार पक्ष व गटाचे तौलनिक संख्या बळानुसार परिवहन समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशित केले जातील.

१७० ठाणे महानगरपालिकेच्या दिनांक २५/११/२००९, दिनांक ०३.१२.२००९ व दिनांक १८.१२.२००९ रोजींच्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत.

१७१ ठाणे महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीचे दिनांक ६/०८/२००९ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

१७२ ठाणे महानगरपालिकेच्या मा.माध्यमिक व पूर्व प्राथमिक शिक्षण समितीचे दि. ३०/०८/२००९ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेबाबत.

१७३ श्री. शशिकांत साळूंखे, कनिष्ठ अभियंता यांना वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टीटयूट, मुंबई येथे Public Health / Environment Engineering या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाकरिता दोन वर्षाच्या कालावधीसाठी पाठविण्यास केलेल्या कार्यवाहीस मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

१७४ स्वा.वि.दा. सावरकर तरण तलाव येथील शुल्क दर वाढीनुसार आकारणी करणेस मा. सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

१७५ स्लॉटर फी, अनुज्ञप्ती फी मध्ये नवीन दराने वाढ करणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत..

१७६ ग्रुप ग्रामपंचायत लोनाड यांना पिसे ते टेमघर या उर्ध्ववाहिनीवर कनेक्शन देणेस मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१७७ कोपरी प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र. ९० मधील नगरसेवक निधी, प्रभाग सुधारणा निधी अंतर्गत करावयाच्या कामांसाठी मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत

१७८ विकास आराखडयानुसार आरक्षित असलेल्या सुविधा भूखंडावरील बांधण्यात आलेल्या इमारतीमधील तळमजल्यावरील जागा वेल्फेअर सेंटर जेष्ठ नागरिक संघाला उपलब्ध करुन देणे बाबतचा प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या फेरविचारार्थ सादर.

१७९ मे. अजिक्य महाराष्ट्र सहकारी गृहनिर्माण सोसायटी नियोजित यांना अंतिम भुखंड क्र. ६७ या प्राथमिक व माध्यमिक शाळेच्या आरक्षणाने बाधित असलेल्या अंदाजे २१७७.४१ चौ.मीटर क्षेत्रावर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविणे व जमिनीचा भाडेपट्टा मे. अजिक्य महाराष्ट्र गृ.नि.सह.संस्था यांना देणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१८० हाजुरी येथील उर्दु शाळेजवळील मल्टीपर्पज हॉल तळ + १ मजली इमारत भाडे तत्वावर देणेबाबत ठराव क्र.१४७ दिनांक २५/११/०९ मा.सर्वसाधारण सभेच्या फेरविचारार्थ.

१८१ ठाणे महानगरपालिकेच्या महात्मा फुले भाजी मंडई व गांवदेवी भाजी मंडई येथील बाजार वसुलीचे दर निश्चित करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१८२ रायलादेवी प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्र.३२ मधील रुपादेवी मैदान या आरक्षित भूखंडात गार्डन तयार करणेसाठी मातीची भरणी करण्यासाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१८३ नौपाडा प्रभाग समिती क्षेत्रातील प्रभाग क्र. ६९ मधील जिजामातानगर येथील ई.एस.आय.एस. ब्रीजलगत आर.सी.सी. रिटेनिंग वॉल बांधणेसाठी येणा-या खर्चास मा. सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१८४ ठाणे शहर पाणी वितरण व्यवस्थे अंतर्गत ठाणे पूर्व विभागामध्ये बेतवडे येथे वॉटर डिस्ट्रीक्ट ई/११ व ई/१२ करीता ठेकेदाराचे स्वतःचे डिझाईननुसार आर.सी.सी. जलकुंभ स्पेसिफीकेशन नुसार डिझाईन करणे, बांधणे, चाचणी देणे व कार्यान्वित करणेच्या कामी वाढीव प्रशासकिय मान्यता मिळणेबाबत.

१८५ ठाणे महापालिका मुख्यालय व गडकरी रंगायतन येथील भंगार सामानाची विल्हेवाट करणेबाबत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१८६ जनरल अरुण कुमार वैद्य मार्गाचे कॉंक्रीटीकरण करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१८७ महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये टिका नं.१२,सिटी सर्व्हे नं.१६६, नौपाडा या भुखंडावरील प्रसुतीगृह व दवाखान्याकरिता परिशिष्ट-पी नुसार विकसित करण्यात आलेल्या आरक्षणाखालील तळ + २ मजल्याचे बांधकाम घंटाळी प्रबोधिनी संस्थेस समाजोपयोगी कामासाठी उपलब्ध करुन देणेकरीता वापरातील बदलासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१८८ ठाणे रेल्वे स्थानक परिसरातील वाहतुक बेटाच्या जागेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा नविन पूर्णाकृती पुतळा उभारणेसाठी पुतळा समिती गठीत करणेबाबत.

१८९ अतिक्रमण नियंत्रण व निष्कासित विभाग (मुख्यालय) मार्फत घेण्यात येणा-या कारवाईकरिता जादा वेळ कामकाजाच्या भत्त्याबाबत मा. सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१९० माजिवडागांव रस्त्यापासून (माजिवडा नाका) ते सम्राट अशोकनगर वसाहतीमध्ये जाणा-या रस्त्यापर्यंत मुख्य रस्त्यावर इंटरलॉकींग ब्लॉक्स बसविणेस येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीस मान्यता मिळणेबाबत.

१९१ माजिवडा मुख्य रस्त्यावरील पेपर प्रॉडक्स कंपनी बस स्टॉपपासून ते हनुमान मंदिर पर्यंतच्या रस्त्यावर इंटरलॉकिंग ब्लॉक्स बसविणेस येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१९२ ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळ आस्थापनेवर एक " वाहनचालक " पद नव्याने निर्माण करणेबाबत.

१९३ ठाणे महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या आस्थापनेवर दोन लघु-टंकलेखक (स्टेनो-टायपिस्ट) पदे निर्माण करणेबाबत.

१९४ तारांगण येथील दुर्घटनेमध्ये शहिद झालेल्या ठाणे महापालिकेच्या अग्निशमन विभागाकडील जवानांच्या कुटूंबियांना आर्थिक सहाय्य म्हणून सन्मा.सदस्यांचे एक महिन्याचे मानधन देणेस मा.सर्वसाधारण सभेची कार्योत्तर मान्यता मिळणेबाबत.

१९५ ठाणे महानगरपालिकेच्या आस्थापनेवर खेळाडूना पाच आरक्षण सरळसेवेने निश्चित करणेस मा.सर्वसाधारण सभेची मान्यता मिळणेबाबत.

१९६ ठाणे महानगरपालिकेचा पर्यावरण सद्यस्थिती दर्शविणारा सन २००८-२००९ चा अहवाल मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस सादर.

१९७ प्र.क्र. २३ मध्ये बाळकूम स्मशानभूमीमध्ये गॅस शवदाहिनी बसविणे आणि इतर स्थापत्य कामे करणेबाबत येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

१९८ ठाणे महानगरपालिकेमार्फत विविध सेवा संस्थांना डक्ट/केबलसाठी आकारण्यांत येणा-या रस्ता-फोड फी दरांत सुधारणा करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या मान्यतेसाठी सादर.

**सोबत:-**

**१ ) ठाणे महापालिका परिवहन समिती सदस्य नेमणूक कार्यक्रम.**

**२ ) नामनिर्देशनपत्र**

**३ ) उमेदवारी मागे घेणेबाबतचे पत्र**

**४ ) प्रतिज्ञापत्र**

**सही/-**
**(सौ. छाया प्र. मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.

**महापालिका सचिव कार्यालय,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे.**
**दिनांक :- ०६.०२.२०१०**

# ठाणे महानगरपालिका,ठाणे.

बुधवार दिनांक १७/०२/२०१० रोजी होणा-या महापालिका परिवहन समितीसदस्य पदासाठी होणा-या नेमणूकीकरीता

नेमणूक कार्यक्रम

| वार | तारीख | वेळ | तपशिल |
|---|---|---|---|
| गुरुवार | ११/०२/२०१० | दुपारी ३.०० ते सायंकाळी ५.३०वा. | परिवहन समिती सदस्य पदासाठी नामनिर्देशनपत्र विहित नमुन्यांत महापालिका सचिव यांचेकडे दाखल करणे. |
| बुधवार | १७/०२/२०१० | | प्रकरण क्र. १६९ पुकारल्यानंतर उमेदवारी मागे घेण्यासाठी १५ मिनिटांचा कालावधी देण्यांत येईल. |
| बुधवार | १७/०२/२०१० | | परिवहन समितीच्या (६) जागांकरीता तौलनिक संख्याबळानुसार शिवसेना भारतीय जनाता पार्टी, बहुजन समाज पार्टी, अपक्ष या गटाचे ०४ सदस्य तसेच राष्ट्रवादी कॉँग्रेस,भारतीय कॉँग्रेस पक्ष, अपक्ष या गटाचे .२ सदस्यांची नांवे मा.महापौर घोषित करतील. |

सही /-
(छाया प्र.मानकर)
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका,ठाणे.
दिनांक :- ६/०२/२०१०